विजय वसंत कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ सलमान खानचा डबल रोल असलेला पहिला चित्रपट कोणता?

— *जुडवा*.

बी. एस. कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ राजेश खन्ना व अमिताभ यांचा पहिला हिट चित्रपट कोणता?

— राजेश खन्नाचा पहिला हिट चित्रपट *आराधना*. अमिताभचा पहिला हिट चित्रपट *जंजीर*.

राजेन राम कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ जुन्या *साजन* या चित्रपटातील नायक-नायिका कोण? निर्माते कोण?

— संजय दत्त, सलमान खान व माधुरी दीक्षित यांची भूमिका असलेला *साजन* या चित्रपटापूर्वी *साजन* नावाचे दोन चित्रपट आले आहेत. पहिला *साजन* १९४७साली फिल्मीस्तानने निर्माण केला होता. नायक-नायिका अशोककुमार-रेहाना, दुसरा *साजन* १९६९ साली मोहन सायगलनी निर्माण केला होता. नायक-नायिका मनोजकुमार-आशा पारेख.

सुरेश जोमा पाटील, बेलवली पेण.

□ अजय देवगण व काजोल यांचा हीट चित्रपट कोणता?

— *प्यार तो होना ही था*.

चैताली चंद्रकांत कोळी, वरेडी-पेण.

□ परेश रावल व ओम पुरीचा पहिला चित्रपट कोणता?

— परेश रावलचा पहिला चित्रपट *अर्जुन*. ओम पुरीचा पहिला चित्रपट *गोन्धूली*.

चैताली चंद्रकांत कोळी, वरेडी-पेण.

□ सुनील शेट्टी व शिल्पा शेट्टी यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?

— *पृथ्वी*.

चैताली चंद्रकांत कोळी, वरेडी-पेण.

□ डॅनीचा पहिला चित्रपट कोणता?

— *मेरे अपने*.

चैताली चंद्रकांत कोळी, वरेडी-पेण.

□ सलमान खान व जॅकी श्रॉफचा पहिला चित्रपट कोणता?

— सलमान खानचा पहिला चित्रपट *बीवी हो तो ऐसी*. जॅकी श्रॉफचा पहिला चित्रपट *स्वामीदादा*.

मुरलीधर दत्त परांजपे, गिरगाव, मुंबई.

□ *नई उमरकी नई फसल*मध्ये तनुजाचा नायक राजीव होता का?

— हो. तो या चित्रपटाचे निर्माते आर. चंद्रा यांचा मुलगा व भारत भूषणचा पुतण्या.


कु. ज्योती कदम, महाड, रायगड.

□ महिमा चौधरी, प्रिया गिल व राणी मुखर्जी यांचा पहिला चित्रपट कोणता?

— अनुक्रमे *परदेस*, *तेरे मेरे सपने* व *मेहंदी*.

सविता नारायण तुर्रे, कर्जत आमराई.

□ गांधीवर निर्माण झालेले चित्रपट कोणते?



— *महात्मा गांधी* (१९४४), *गांधी*, *हे राम*, *नाईन अवर्स टू रामा*

सुधाकर परुळेकर, पुणे.

□ *सत्यात* पोलीस इन्स्पेक्टरची भूमिका करणाऱ्या नटाचे नाव काय?

— श्रीवास्तव.

सचिन शिर्के, मंगळवेढा.

□ *हर दिल जो प्यार करेगा*मध्ये सलमानच्या मित्राची अब्दुल ऊर्फ आभाची भूमिका करणारा नट कोण?

— नीरज वोरा.

सुबोध, चेंबूर.

□ कमल हासनचा पहिला चित्रपट कोणता?

— *एक दुजे के लिए*.

मीली, मालाड.

□ अरुणा इराणीचा पहिला चित्रपट कोणता?

— *सोने की चिडियाँ* या चित्रपटात बालतारका म्हणून अरुणा इराणी सर्वात प्रथम पडद्यावर आली. *गुनाहों का देवता* या चित्रपटातील भूमिका तिची पहिली प्रौढ भूमिका.

सौ. सुधा कोर्टीकर, पंढरपूर.

□ व्ही. शांताराम व संध्या यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?



— *परछाई*, *दो आँखे बारह हाथ*, *स्त्री*.

कृष्णा अंबाजी कोळी, वरेडी-पेण.

□ संगीतकार अन्नू मलिकचा पहिला चित्रपट कोणता?

— *हंटरवाली ७७*.

कृष्णा अंबाजी कोळी, वरेडी-पेण.

□ मुकेश ऋषीचा पहिला चित्रपट?

— *गर्दिश*.

कृष्णा अंबाजी कोळी, वरेडी-पेण.

□ रणजितचा पहिला चित्रपट?

— *रेश्मा और शेरा*.

विजय सदाशिव देव, मुरगूड, जि. कोल्हापूर.

□ *ज्युली* केव्हा प्रदर्शित झाला होता? या चित्रपटात ज्युलीची व तिच्या बहिणीची भूमिका करणारी अभिनेत्री कोण?

— *ज्युली* १९७५ला आला होता. या चित्रपटात लक्ष्मीने ज्युलीची भूमिका केली होती व तिच्या बहिणीची भूमिका श्रीदेवीने.

के. एस. कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ दिलीपकुमार, सायराबानू यांनी एकत्र भूमिका केलेला चित्रपट?

— *गोपी*, *सगिना*, *बैराग*, *दुनिया*.

के. एस. कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ शशी कपूरचा पहिला व शेवटचा चित्रपट?

— पहिला चित्रपट *आग*. या चित्रपटात शशी बालकलाकार होता. त्याने नायकाची भूमिका केलेला पहिला चित्रपट *चार दिवारी*. त्याचा शेवटचा चित्रपट *उच नीच बीच*.

दिव्या जगदीप कोळी, वरेडी.

□ अजय देवगण-काजोल व गोविंदा-नीलम यांचा पहिला चित्रपट कोणता?

— अजय-काजोलचा पहिला चित्रपट *गुंडाराज*, गोविंदा-नीलमचा पहिला चित्रपट *इल्जाम*.

काजल मनोहर कोळी, वरेडी कोळीवाडा.

□ अमरीश पुरी व प्रेम चोप्रा यांनी खलनायकाची भूमिका केलेला पहिला चित्रपट कोणता?

— अमरीश पुरीचा पहिला चित्रपट *मंथन*, प्रेम चोप्राचा पहिला चित्रपट *वह कौन थी?* ●